# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**

ई-मेलः **mercindia@merc.gov.in**

वेब-साईट www.mercindia.org.in; www.merc.gov.in

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१३ च्या मसुद्यावर महाराष्ट्र राज्यातील जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

महाराष्ट्रातील औष्णिक विद्युत निर्मिती कंपन्यांनी आयोगाला असे सादर केले आहे की, राज्यातील वीज निर्मिती केंद्रांना कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल) आणि तिच्या उप-कंपन्यांकडून होणाऱ्या देशी कोळशाच्या पुरवठ्यात तुटवडा निर्माण झाल्याने निर्मिती संचांकडून कमी वीज निर्माण करण्याच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे, सर्वोच्च वीज मागणीच्या (पीक लोड) तासांमध्ये विजेची गरज भागविण्यासाठी उपलब्ध कोळशाचा किफायतशीरपणे वापर करण्याकरिता आणि सर्वोच्च मागणी नसलेल्या तासांदरम्यान वीज निर्मिती संचाची वीज निर्मिती कमी करण्यासाठी, निर्मिती कंपन्यांना दंड टाळण्यासाठीच्या उद्देशाने देखील, दैनंदिन वीज निर्मितीचे नियोजन करणे आवश्यक झाले आहे.

यासंबंधी योग्य विचार करुन, आयोग, सर्वोच्च वीज मागणीच्या तासांमध्ये अधिक विजेची निर्मिती करण्यासाठी आणि कोळशाचा टंचाईच्या काळात कोळशाचा किफायतशीर वापर विचारात घेऊन सर्वोच्च वीज मागणीच्या तासांनुसार विजेची क्षमता घोषीत करण्यासाठी, वीज निर्मिती कंपन्यांना प्रोत्साहन देण्याकरिता सहाय्यभूत ठरणाऱ्या तरतुदींचा समावेश करण्यासाठी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ (मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११) मध्ये सुधारणा करण्याचा सध्या विचार करीत आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये करावयाच्या सुधारणा विनियमाचा मसुदा स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१३ चा मसुदा www.mercindia.org.in / www.merc.gov.in या आयोगाच्या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग, याद्वारे उपरोक्त मसुद्यावर जनता / हितसंबंधितांकडून सूचना आणि / किंवा हरकती मागवित असून, या सूचना आणि हरकती, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४०० ००५, या पत्त्यावर, फॅक्स : ०२२-२२१६३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in, दि. ९ ऑगस्ट, २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने कृपया पाठवाव्यात.

सचिव,
मविनिआ

ठिकाण :मुंबई
दिनांकः ८ जुलै, २०१३